# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 18/2024 दिनांक : 11.01.2024**

## 1)खुन :–

**बिलोली** :–दिनांक 09.06.2023 रोजी चे 13.00 चे नंतर वेळ नक्की नाही, **मौ. गंजगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे कृष्णा रामलु बावलगावे, वय 25 वर्षे, रा. गंजगाव ता. बिलोली जि. नांदेड** यास यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून पुर्व दुश्मनीवरून त्यास भांडण विसरून पार्टी करूत असे म्हणुन नदीचे काठावर नेऊन दगडाने तोंडावर, नाकावर, मारून त्याचा गळा दाबुन खुन करून त्याचे प्रेत नदी पात्रात फेकुन देवुन पुरावा नष्ट केला असा अर्ज मा. कोर्टात दिले वरून मा. न्यायालयाचे आदेशावरून कलम 153(3) सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल. सदर घटनेवरून या पुर्वी आ.म्र. नं. 10/2023 कलम 174 सीआरपीसी दि. 11.06.2023 अन्वये दाखल झाला होता. वगैरे **फिर्यादी रामलु पि. सायलु बावलगावे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. गंजगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरन 02/2024 कलम 302, 324, 323, 201, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्रीमती बळेगावे मॅडम, मो.नं. 9445490046** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**लोहा** :–दिनांक 09.01.2024 रोजी चे 20.15 वा. चे सुमारास, **एच. पी पेट्रोलपंपा जवळ लोहा येथील रेस्ट हाऊस जवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एडब्ल्यु–5119 वर बसुन एचपी भिमाशंकर पेट्रोलपंपावर डिझेल व पेट्रोल विक्री केलेले 4,91,000/–रूपये काळया बॅगमध्ये टाकुन मोटार सायकलला अडकुन पेट्रोलपंप मालक यांना राजारामनगर लोहा येथे घरी नेऊन देण्यास जात असतांना लोहा येथील रेस्ट जवळ आले असता पाठीमागुन बिना नंबरची स्पलेंडर प्लस मोटार सायकलवर तीन अनोळखी इसम तोंडास पांढरे रूमाल बांधलेले त्यातील एका इसमाने फिर्यादीला ये ये म्हणुन आवाज दिला असता फिर्यादीने गाडी थांबवली नाही तेंव्हा त्यांनी फिर्यादीचे मोटार सायकलच्या जवळ येऊन चालत्या मोटार सायकलला लाथ मारून खाली पाडुन तीन अनोळखी इसमा पैकी एका इसमाने त्याच्या जवळील तलवारीचा धाक दाखवुन फिर्यादी जवळील पैशाची बॅग जबरीने हिसकावुन घेऊन सदर चोरटे मोटार सायकलवर बसुन शिवाजी चौक लोहयाकडे पळुन गेले. वगैरे **फिर्यादी नारायण गोविंद नागरगोजे, वय 33 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. काळे गल्ली ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 05/2024 कलम 392, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हासले मो. क्रं 9552781091** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 10.01.2024 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **खुदबेनगर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांचे मावसीला भेटण्यासाठी गेला असता यातील चार आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडण्याच्या कारणावरून शिवीगाळ केली व लाथा बुक्यांनी मारहाण करून आरोपीतांनी काठीने उजव्या हातावर मारून हात फॅक्चर करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शेख बाबु शेख सत्तार, वय 24 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. खुदबेनगर ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 26/2024 कलम 325,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंगे, मो. नं. 9923480486** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 10.01.2024 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **वाजेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा दिर आरोपी यांने घराचे वाटणीचे कारणावरून फिर्यादीचे पतीस शिवीगाळ करून थापडा बुक्यानी मारहाण केली व हातातील सिमेंटचे पत्राने उजव्या हाताचे मनगटावर मारून फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सौ. प्रीती विनोद राऊत, वय 35 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. गोपाळचावडी ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण गुरन** 25/2024 कलम 325,323,504,506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो. नं. 8788371187** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**1)लिंबगाव :–** दि. 09.01.2024 रोजी चे 06.00 वा. चे सुमारास, **नांदेड ते सुगाव जाणारे रोडवर आक्सा कॉलनीजवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे विश्वनाथ मारोती काळे, वय 35 वर्षे, रा. कावलगाव ता. पुर्णा जि. परभणी** यास कोणत्यातरी अज्ञात वाहान चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे चालवुन यातील फिर्यादीचे पतीस धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी अर्चना विश्वनाथ काळे, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कावलगाव ता. पुर्णा जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं. 04/2024 कलम 279, 304(अ) भादवी सह कलम 134/177 मो वा का कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पवार, मो.क्र. 9823288458** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दि. 09.01.2024 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **हिंगोलीगेट ओव्हरब्रीजच्या खाली एनआरआयच्या बिल्डींग समोर नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रल्हाद साळकीराम रणवीर, वय 55 वर्षे, रा. पोर्णीमानगर नांदेड** हा त्याची स्कुटी क्रं एमएच–26/झेड–1198 वर बसुन स्कुटी चालवित तारासिंग मार्केट येथे जात असताना हिंगोलीगेट ओव्हरब्रिजच्या खाली एनआरआयच्या बिल्डींग समोर आले असता कार क्रमांक एमएच–26/सीई–9696 च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयी व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन पाठीमागुन धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी सिध्दार्थ प्रल्हादराव रनवीर, वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पोर्णीमानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 19/2024 कलम 279, 337, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्री गिरे मॅडम, मो.क्र. 8411835457** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड